# * प्रकरण ३ रे *

## प्रकरण ३ रे

### संशोधन पद्धति

संशोधकांनी शोधकार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला. इ. ९ वी च्या वर्गातील मुलांची सद्यस्थितीची तपासणी करण्यासाठी शहरी भागांतील पुढील ५ शाळांची निवड करून सर्वेक्षण कार्य केले.

शहरी शाळा

१) बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालय उस्मानाबाद.

२) श्रीपतराव भोसले विद्यालय उस्मानाबाद.

३) कन्या प्रशाला उस्मानाबाद.

४) छत्रपति शिवाजी विद्यालय उस्मानाबाद.

५) भारत हायस्कूल उस्मानाबाद.

विद्यार्थ्यांना भरून देण्यासाठी प्रश्नपत्रिका तयार करून त्यांचे प्रतिसाद एकत्रित केले.

### शहरी विभागातील विद्यार्थी प्रतिसाद.

| शहरी विद्यार्थी : फॉर्म | परत आलेली संख्या : | प्रतिसाद शेकडेवारी |
|---|---|---|
| ५० | ४७ | ९४.०० |

### ब- शहरी विभागातील विद्यार्थिनी प्रतिसाद

| प्रतिसादसाठी दिलेले फॉर्मस् संख्या | परत आलेल्या फॉर्मची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २५ | २१ | ८४·०० |

ग्रामीण विभागांतील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी काजळा, कामेगांव व उपळे ( मा. ) या शाळांची निवड करून विद्यार्थी विद्यार्थिनींना प्रश्न प्रश्नावली दिली होती·

### ग्रामीण विभागांत विद्यार्थी यांचा प्रतिसाद

| प्रतिसादासाठी दिलेल्या फॉर्म संख्या· | परत आलेल्या फॉर्मची संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २५ | ११ | ४४·०० |

### ग्रामीण विभागातील विद्यार्थिनींचा प्रतिसाद

| एकूण दिलेल्या फॉर्मची संख्या | परत आलेली संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २५ | १० | ४०·०० |

ग्रामीण आणि शहरी भागांतील विद्यार्थी विद्यार्थिनींना मराठी भाषेच्या माध्यमांतून लोक संख्या विषयाचे मिळणारे ज्ञान अत्यंत उजवी स्वरूपाचे असल्याने मराठी शिक्षकांची मुलाखत घेऊन शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद संशोधकांनी तपासून पाहिला.

मराठी विषय शिक्षकांच्या प्रतिसाद ( ग्रामीण विभाग )

| दिलेल्या फॉर्म संख्या | परत आलेल्या फॉर्म ची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ५० | ४४ | ८८·०० |

ग्रामीण विभागा प्रमाणेच शहरी विभागांतील शाळांमध्ये शिकविणा-या मातृ भाषा शिक्षकांनीही प्रतिसाद दिला त्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले.

मराठी विषय शिक्षकांचा प्रतिसाद ( शहरी विभाग)

| दिलेली फॉर्म संख्या | परत आलेली फॉर्म संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १५ | १२ | ८०·०० |

लोकसंख्या शिक्षणाचे कार्य करणा-या मराठी शिक्षकांना दैनंदिन कामकाजामध्ये मार्गदर्शन करणा-या मुख्याध्यापकांची मुलाखत घेण्यात आली व त्यांनाही प्रश्न पत्रिका देण्यात आली आपल शाळेत कार्य करणा-या शिक्षकांना मुख्याध्यापक कोणत्या प्रकारे मार्गदर्शन करतात हे अजमावुन पहाण्यासाठी संशोधकांनी शहरी व ग्रामीण विभागांत कार्य करणा-या मु मुख्यापकांची मुलाखत घेतली त्यांच्या प्रतिसादाचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले.

मुख्याध्यापकांचा प्रतिसाद [ शहरी विभाग ]

| दिलेली फॉर्म संख्या | परत आलेली फॉर्म संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १० | ७ | ७०.०० |

ग्रामीण विभागामध्ये या विषयाबद्दल अनेक गैरसमज व अपसमज असल्याने ग्रामीण शाळामध्ये महत्त्वाचे कार्य करणा-या मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद संशोधकांनी नोंदवुन घेतला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## मुख्याध्यापकांचा प्रतिसाद [ ग्रामीण विभाग ]

| दिलेली फॉर्म संख्या | परत आलेली फॉर्म संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २५ | १८ | ७२.०० |

मराठी विषयाच्या इ. ९ वी च्या क्रमिक पुस्तकाद्वारे विद्यार्थ्यांवर संस्कार करणाऱ्या शिक्षकांची कार्यपद्धती व मुख्याध्यापकाकडून त्यांना मिळणारे मार्गदर्शन यांची सद्यस्थिती संशोधकास चिंताजनक वाटली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून त्यांचे या विषयाचे अल्प ज्ञान दिसून आले. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना या विषयाचे खरे स्वरूप अद्यापही नीटसे समजलेले नसून त्यांचे या विषयाबद्दल पाहिजे तेवढे औत्सुक्य संशोधकास आढळलेले नसल्याने संशोधकांनी त्यांना शिकविणारे शिक्षक व मार्गदर्शक मुख्याध्यापक यांचेसाठी काही खास प्रशिक्षणाचा कार्यक्रम सुचित केलेला आहे.

विद्यार्थी विद्यार्थिनींना या विषयाचे ज्ञान देण्यासाठी प्रत्येक पाठामध्ये संशोधकांनी लोकसंख्या शिक्षणाचा आशय अभ्यासासाठी उपयुक्त जागा शोधलेल्या आहेत. त्या जागांचा विचार करून काही प्रयोजनक्षम असे उपक्रम सुचविलेले आहेत.

प्रत्येक पाठाचा आशय, वाक्य, म्हणी इ.इ. हे पृथःकरण करून लोकसंख्या विषयाचे शिक्षण अधिक परिणामकारक रीतीने करे द्यावे ? याबाबत संशोधकांनी आपले नियोजन अधिक सुस्पष्ट रीतीने मांडलेला आहे.

## तज्ञांचे मार्गदर्शन व मुलाखती

महाराष्ट्र राज्य शै.संशो. संस्था विद्यमाने घेण्यात येणा-या लोकसंख्या शिक्षण प्रशिक्षण शिबिरामध्ये तज्ञ म्हणून मार्गदर्शन करणा-या व्यक्तींची मुलाखत संशोधकांनी घेतली त्यांच बरोबर उस्मानाबाद जिल्ह्यांतील शिक्षण क्षेत्रातील प्रशासकांशी प्रशासकीय अडीअडचणीबाबत चर्चा विमर्ष केला. लोकसंख्या शिक्षणाच्या उपयोगितेबाबत व विद्यमान प्रचार व प्रसार प्रयत्नांच्या त्रुटीबाबत संबंधीत मान्यवरांनी उचित मार्गदर्शन केले.

लोकसंख्या शास्त्राचे तज्ञ प्रशिक्षण केंद्रावर मार्गदर्शनाचे कार्य करित असतांना त्यांना येणा-या अडचणींचा तत्वविमर्ष अत्यंत मनमोकळेपणाने त्यांनी केला. संशोधकसुद्धा जिल्हा लोकसंख्या शिक्षण प्रशिक्षण केंद्रावर तज्ञ मार्गदर्शकांचे कार्य पहात होते. तेव्हा त्यांना जाणवलेल्या समस्यांची नोंद त्यांना सदरहु प्रकल्पामध्ये केलेली आहे.

प्रशिक्षित शिक्षक व प्रशासक संबंध

प्रशिक्षित शिक्षक व प्रशासक यांचेक परस्पर सहकार्य व प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या कार्यात दिसून येणा-या गंभीर समस्यांची सोडवणूक अत्यंत गरजेचे वाटते. त्यासाठी अध्यापकांच्या मुलभूत पविता शास्त्रीय पद्धतीने परिवर्तीत करणे आवश्यकचे वाटते.

## तज्ञांच्या प्रतिसादाचे पृथःकरण

| दिलेली फॉर्म संख्या | परत आलेली फॉर्म संख्या | प्रतिसादाचे प्रमाण. |
|---|---|---|
| १५ | ११ | ७३.३३ |

== प्रकरण ४ थे (अ) ==

## प्राप्त माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण

### शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांची सद्यस्थितीची तुलना

संशोधकाने लोकसंख्याशिक्षण विषयक आशयाचे ज्ञान ई. ९ वी च्या मराठी पुस्तकांतील आशयाचे सहाय्याने तपासून पाहिले. तेव्हा विद्यार्थ्यांना चाचणी प्रश्नपत्रिकेमध्ये विविध प्रकारचे २० प्रश्न दिलेले होते. त्या प्रश्नांच्या सहाय्याने संशोधकाने शहरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांची तुलना पुढील प्रकारे केली.

१. लोकसंख्या शिक्षणाची व्याख्या शहरी विभागातील ५१ % विद्यार्थ्यांनी बरोबर एका वाक्यात लिहिली तरी अवघ्या ९ % विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागांत ही व्याख्या लिहिण्यात यश मिळविले या विषयाबद्दल शहरी विभागापेक्षा ग्रामीण विभागांत कमी अज्ञान आहे.

२. शिक्षकांनी लोकसंख्या विषयाची माहिती मराठी पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने दिलेली नव्हती असे ग्रामीण विभागात दिसून येते ग्रामीण विद्यार्थ्यांचा प्रतिसाद परिपूर्ण नकारार्थी असून शहरी ६०% विद्यार्थ्यांनी मात्र ही माहिती आपणांस शिक्षकांनी दिली होती असे नोंदविलेली आहे.

३. शिक्षकांनी शिकवितांना लोकसंख्या शिक्षणाचा आशय ज्या गद्यपाठांच्या सहाय्याने समजावून सांगितला अशा पाठांची नांवे लिहिण्यामध्ये ६६% शहरी विद्यार्थी तर २७% ग्रामीण विद्यार्थी यशस्वी ठरले. शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण विद्यार्थ्यांना लोकसंख्या शिक्षणाचा आशय समजावून देण्याच्या पाठांची नावे देखिल माहित नाहीत.

४. लोकसंख्या शिक्षणाचा आशय स्पष्ट करण्यासाठी ज्या पत्र पाठाचा उपयोग होऊ शकतो अशा पत्र पाठाची नावे शहरी विभागातील ६४% विद्यार्थ्यांनी तर ग्रामीण विभागातील ४५ % विद्यार्थ्यांनी सुचविलेली आहेत. पत्रपाठ हा प्रकार या विषय उपयुक्त ठरू शकतो या बद्दल शहरी विद्यार्थ्यांच्या मानाने ग्रामीण विद्यार्थी अज्ञानी आहेत.

५. निबंध हा लेखन प्रकार लोकसंख्या शिक्षणासाठी उपयुक्त ठरू शकतो निबंध लेखन बाबत शहरी विद्यार्थ्यांनी ७७% तर ग्रामीण विद्यार्थ्यांनी ८२ % होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे. शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण विद्यार्थी लेखन प्रकारामध्ये अधिक स्वतंत्ररीतीने विचार करू शकतात.

६. लोकसंख्या विषयातील आशय स्पष्ट करण्यासाठी निबंध लेखना-प्रमाणेच उपयुक्त असणारा आणखी एखादा लेखन प्रकार विद्यार्थ्यांना देता येईल, या संबंधीत शहरी विद्यार्थ्यांनी ८५ % तर ग्रामीण विद्यार्थ्यांनी ८२ % होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे. निबंध लेखन प्रकाराप्रमाणेच पत्र लेखन हा प्रकार उपयुक्त ठरू शकतात असे संशोधकास वाटते.

७. लोकसंख्या शिक्षण व कुटुंब नियोजन या दोन विषयाची व्याख्या विद्यार्थ्यांना माहिती असणे जरूर आहे. कुटुंब नियोजनाची व्याख्या ७० शहरी विद्यार्थ्यांनी बरोबर लिहिलेली आहे तर ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांचे हेच प्रमाण ४५ % इतके आहे. म्हणुन ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांचे कुटुंब नियोजनाच्या व्याख्येबद्दलचे अज्ञान जाणे आवश्यक वाटते.

८. कुटुंब नियोजन विषयाचा आशय असणाऱ्या धड्याचे नांव लिहिण्यात शहरी विद्यार्थी ८३% तर ग्रामीण विद्यार्थी ४५ % यशस्वी झालेले आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांनी कुटुंबनियोजनाचा आशय असणाऱ्या पाठांची नांवेही माहित नाहीत.

९. ७७% शहरी विद्यार्थी तर ८२% ग्रामीण विद्यार्थ्यांना लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम माहित आहेत. शहरी विद्यार्थ्यांच्या मानाने ग्रामीण विद्यार्थ्यांना दुष्परिणामाची जाणीव अधिक वाटते कारण ग्रामीण विभाग शहरी विभागापेक्षा कमी गजबजलेले आढळतात.

१०. ८९% शहरी विद्यार्थ्यांना तर ७३% ग्रामीण विद्यार्थ्यांना आपली लोकसंख्या योग्य प्रमाणांत असावी असे वाटते. लोकसंख्येच्या प्रमाणबद्धतेबाबत ग्रामीण विद्यार्थ्यांना अधिक मार्गदर्शन मिळणे आवश्यक वाटते.

११. लोकसंख्या शिक्षणाचा आशय निसर्गवर्णनपर पाठाद्वारे स्पष्ट करणे अधिक सोयीचे ठरते. निसर्गवर्णनाबद्दल उपयुक्त पाठांची नावे ८९% शहरी तर ८३% ग्रामीण विद्यार्थ्यांनी लिहिलेली आहेत. निसर्गवर्णनपर पाठाची उपयुक्तता ग्रामीण भागांत अधिक प्रभावी रीतीने समजावुन देणे गरजेचे आहे.

१२. लोकसंख्या वाढीमुळे निसर्गातील शुद्ध पर्यावरणाचा समतोल बिघडतो व दुष्परिणाम लोकांना भोगावे लागतात. दुष्परिणाम नोंदवितांना ७७% शहरी विद्यार्थी तर ७५% ग्रामीण विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. दुष्परिणामाबाबत शहरी विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आढळते.

१३. लोकसंख्या शिक्षणातून जीवनांत उपयुक्त शिक्षण दिलेले जाते. जीवनास आवश्यक अशा गोष्टींचे ज्ञान देणा-या पाठांची नांवे ८१% शहरी तर ४५% ग्रामीण विद्यार्थ्यांनी नोंदविलेली आहेत. ग्रामीण विभागांत जीवनशिक्षण जाणीव प्रभावी रीतीने निर्माण केली पाहिजे.

१४. लोकसंख्या शिक्षणास पोषक असणा-या अशा गोष्टी विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमांतून सांगता येतात. टाळता येणा-या घटना बाबत ७४% शहरी विद्यार्थ्यांनी तर ४५% ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपला प्रतिसाद नोंदविला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्या शिक्षणास पोषक असणा-या बाबींची जाणीव अधिक रीतीने निर्माण करणे आवश्यक आहे.

१५. व्यक्तिगत आरोग्य व सार्वजनिक आरोग्य हा लोकसंख्या शिक्षणाचा आत्मा आहे. आरोग्य चांगले राखण्याबाबत शहरी विद्यार्थ्यांनी ८१% तर ग्रामीण विद्यार्थ्यांनी २३% प्रतिसाद दिलेला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांनी व्यक्तीगत आरोग्याबाबत तसेच सार्वजनिक आरोग्याबाबतचे योग्य शिक्षण देणे आवश्यक आहे.

१६. लोकसंख्या शिक्षणामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम अत्यंत महत्वपूर्ण आहे. शालेय परिसर व घरांभोवती वृक्षारोपण करण्याबाबत ७९% शहरी तर १०० % ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपला प्रतिसाद नोंदविलेला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांप्रमाणेच शहरी विद्यार्थ्यांनाही वृक्ष जोपासनेचे महत्व माहित करून देणे आगत्याचे आहे. वृक्षामुळे ______________ मदत होते.

१७• वन्यपशूंचे रक्षण व संवर्धन करणे हा लोकसंख्या शिक्षणाचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे• विद्यार्थ्यांना प्रिय असणाऱ्या वन्य पशूंच्या माहितीबाबत शहरी विद्यार्थ्यांनी १००%• तर ग्रामीण विद्यार्थ्यांनी ९७% प्रतिसाद नोंदविलेला आहे• वन्य पशूंची नावे त्यांचे जीवन याबद्दल विद्यार्थ्यांची जिज्ञासा जोपासणे गरजेचे आहे•

१८• बचतीची सवय असणे ही व्यक्तीगत काटकसरीची सवय लोकसंख्या शिक्षणाच्या उपक्रमाचे महत्त्वपूर्ण अंग आहे• बचतीच्या सवयीबाबत १००% शहरी विद्यार्थ्यांनी तर ९१% ग्रामीण विद्यार्थ्यांनी होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे• शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विभागात देखील बचतीच्या सुविधा सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे•

१९• व्यक्तिगत जीवनामध्ये काटकसरीने वागुन साधन संपत्तीचा योग्य प्रमाणात सर्वांनी उपभोग घेणे गरजेचे आहे• काटकसरीने वागण्याबाबत, १००% विद्यार्थ्यांनी तर ९१% ग्रामीण विद्यार्थ्यांनी होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे• काटकसरीने नैसर्गिक संपत्तीचा उपयोग घेण्याचे शिक्षण ग्रामिण विद्यार्थ्यांना दिले पाहिजे•

२०• घर आणि गाव यांना सुखी जीवनाचा लाभ घडविण्याचे शिक्षण मिळाले गरजेचे आहे. सुखीबद्दल १००% शहरी विद्यार्थ्यांनी तर ९१ % ग्रामीण विद्यार्थ्यांनी होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे• शिक्षणाच्या माध्यमातुन सुखी , समाधानी समृद्ध, समान घडविण्याचे शिक्षण ग्रामीण विद्यार्थ्यांना देणे अधिक गरजेचे आहे.

## शहरी व ग्रामीण शाळेतील विद्यार्थिनींच्या सद्यस्थितीची तुलना

लोकसंख्या शिक्षण एका पुरुषाला दिले तर ते व्यक्तिपुरते मर्यादित रहाते. परंतु जर एका स्त्रीस आशयाचे शिक्षण दिले तर, ते कुटुंबास दिल्यासारखे आहे. भारतीय शिक्षणात मुलींच्या व स्त्रियांच्या शिक्षणाचे अनेक प्रश्न अद्यापही सुटलेले नसल्याने संशोधकांनी इ. ९ वी मध्ये मराठी विषय शिकणाऱ्या शहरी व ग्रामीण विद्यार्थिनींचा प्रश्नावली द्वारे प्रतिसाद तपासून पाहिला. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे मांडण्यात आलेला आहे.

१. लोकसंख्या शिक्षणाची एका वाक्यामध्ये व्याख्या करताना ७३% शहरी विद्यार्थिनी तर ~~[illegible]~~ ३० % ग्रामीण विद्यार्थिनी यशस्वी झाल्या आहेत. लोकसंख्या शिक्षणाचे ज्ञान मुलींना, स्त्रियांना देण्यात संकोच दिसून आलेला आहे. मुलांच्या मताने मुली जास्त भित्र्या वाटतात. या विषयाकडे गैरसमज अपसमज मनात ठेवून पहातात असे दिसले.

२. इ. ९ वी चे मराठी विषयाचे पाठ शिकवताना शिक्षकांनी लोकसंख्या शिक्षणाचा आशय पूरक माहितीस्तव दिलेला असल्याने २७% शहरी विद्यार्थिनी तर ५०% ग्रामीण विद्यार्थिनी सुचविलेले आहे. ग्रामीण विभागांतील शिक्षकांनी विद्यार्थिनींना या विषयाची जाण ? देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ग्रामीण विभागांतील मागासलेपणाच्या वातावरणाचा परिणाम मुलींच्या दैनिक जीवन पद्धतीवर आढळला.

३. लोकसंख्या आशय समजण्यासाठी पोषक ग ?
नवि ९% शहरी विद्यार्थिनींनी तर ७० % ग्रामीण विद्यार्थिनींनी लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. पाठांचे वर्गीकरणही ९० % विद्यार्थिनींना माहिती नाही असे दिसले. या क्षेत्रात अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

8821

B

४. लोकसंख्येचे आशयाची माहिती देणारे पत्रपाठ ३८% शहरी विद्यार्थिनींनी तर २०% ग्रामीण विद्यार्थिनींनी उल्लेखित केलेले आहेत. पत्रपाठांच्या विषयाशी लोकसंख्या आशयाशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

५. लोक संख्या विषयाचा आशय असणारे निबंध लिहिला असल्याचे प्रतिपादन ३३ % शहरी विद्यार्थिनींनी तर ५०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेले आहे. निबंध लेखना सारखा उपयुक्त लेखन प्रकार दुर्लक्षित वाटतो. या लेखन प्रकाराच्या सहाय्याने प्रबोधन होणे गरजेचे आहे.

६. लोकसंख्या शिक्षणाच्या आशयाशी संबंध संबंधित असणारा अन्य लेखन प्रकार माहित असल्याचे प्रतिपादन ७८% शहरी विद्यार्थिनींनी तर ९०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेले आहे. कथालेखन संवादलेखन, इ. अन्य वाङ्मय प्रकाराचे ज्ञान शहरी व ग्रामीण विभागांतील मुलींना देणे आवश्यक आहे. शहरी विभागांतील विद्यार्थिनींच्या लेखन प्रकाराकडे अधिक लक्ष पुरविणे गरजेचे वाटते.

७. कुटुंब नियोजनाची सुस्पष्ट व्याख्या एका वाक्यात सांगण्याचा प्रयत्न ६२% शहरी विद्यार्थिनींनी तर ६० % ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेला आहे. शहरी विद्यार्थिनींपेक्षा ग्रामीण विद्यार्थीनींना कुटुंब नियोजनासारख्या विषयांवर बोलण्यास संकोच वाटला. निसंकोचपणे कुटुंब कल्याणाचा कार्यक्रम त्यांच्यापुढे ठेवणे गरजेचे आहे.

८. कुटुंब नियोजन विषयाचा आशय असणाऱ्या पाठांची नावे लिहिण्याचा प्रयत्न ५२% शहरी विद्यार्थिनींनी तर ५०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेला आहे. ग्रामीण विद्यार्थिनींला या पाठाची

नावे ही माहिती नाहीत असे आढळले. पाठ शिकवतांना शिक्षकांनी त्यांना लोकसंख्या शिक्षण आराम असणा-या पाठाचे वर्गीकरण करून देणे आवश्यक वाटते.

९. लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम नोंदविण्याचा प्रयत्न ४३% शहरी विद्यार्थिनींनी तर ६० % ग्रामीण विद्यार्थिनींनी केला आहे. शहरी विभागापेक्षा ग्रामीण विभागांत राहाणा-या विद्यार्थिनींना लोकसंख्या वाढीच्या दुष्परिणामांची जाणीव अधिक झालेली आढळले. वाढत्या दुष्परिणामांची भिषण स्थिती विद्यार्थिनींनी समजणे गरजेचे आहे.

१०. आपल्या देशांतील लोकसंख्या प्रमाणात असल्याचे ज्ञान ५२% शहरी तर अवघे ३०% ग्रामीण विद्यार्थिनींना आहे. वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम व प्रमाणांत असणा-या लोकसंख्येचे फायदे शहरी विद्यार्थिनींना चांगले माहित असल्याचे आढळले. ग्रामीण विभागांत प्रमाणांत असणा-या लोकसंख्येचे फायदे समजावून देणे अधिक गरजेचे आढळले.

११. पाठ्यपुस्तकामध्ये निसर्गवर्णनपर गद्यपाठांची नावे लिहण्याचा प्रयत्न ८६% शहरी तर ७०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केला आहे. विद्यार्थिनींना निसर्गरचनेची व प्रदूषणाची माहिती देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थिनी मध्ये अधिक निसर्गप्रेम निर्माण करणे गरजेचे आहे वाटते.

१२. लोकसंख्या वाढीमुळे निसर्गातील पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लिहिण्याचा प्रयत्न ६२% शहरी तर ७०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केला आहे. शहरी विद्यार्थिनींपेक्षा ग्रामीण विद्यार्थिनींना

वाढत्या प्रदूषणाची जाणीव अधिक आढळते. शहरी विद्यार्थिनी मध्ये प्रदूषणापासुन मानवी जिवनाचे रक्षण करण्याची प्रवृत्ती जोपासली पाहिजे.

१३. मराठी विषयाचा पाठ शिकवतांना जीवनावश्यक ज्ञान होणा-या बाबींचा उल्लेख ६२% शहरी तर ७०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेला आहे. ग्रामीण विद्यार्थिनींपेक्षा शहरी विद्यार्थिनींना जीवनांत प्रत्यक्ष अडचणींची जाणीव शहरी वातावरणातील सुखसोयीमुळे झालेली नसल्याचे आढळले. जीवनांतील खरा आस्वाद घेण्याची निरोगी क्षमता शहरी विद्यार्थीत जोपासणे गरजेचे आहे.

१४. लोकसंख्या शिक्षणांत मारक असणा-या गोष्टी टाळण्याची जाणीव नोंदविण्याचा प्रयत्न ९५% शहरी ७०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेला आहे. शहरामध्ये ग्रामीण विभागापेक्षा अनेक प्रकारची प्रदूषणे दिसून येतात त्यामुळे शहरी विद्यार्थिनी मारक गोष्टीबद्दल अधिक सतर्क आढळतात. ग्रामीण भागांतील विद्यार्थिनींना ही जाणीव पाठ्यपुस्तकाच्या आधारे देणे गरजेचे आहे.

१५. व्यक्तिगत व सार्वजनिक आरोग्य चांगले राखण्याचा प्रयत्न ९०% शहरी तर ६०% ग्रामीण भागांतील विद्यार्थिनींनी केलेला आहे. व ग्रामीण विभागातील विद्यार्थिनीला व्यक्तीगत आरोग्य विषयक नियम तसेच सार्वजनिक आरोग्याचे नियम समजावून सांगणे गरजेचे आहे.

१६. शाळे सभोवती व घराभोवती वृक्षरोपण करण्याबाबत ८६% शहरी तर ९०% ग्रामीण विद्यार्थिनींनी अनुकूल प्रतिसाद नोंदविलला आहे. वृक्ष जोपासण्याचा संस्कार शहरी विद्यार्थिनींवर

करणे आवश्यक आढळले.

१७. विद्यार्थिनींना प्रिय असणाऱ्या वन्यपशुंची नोंद ८६% शहरी तर ८०% ग्रामीण विद्यार्थिनींनी केलेली आहे. ग्रामीण विभागांत वन्य पशु पालन जोपासना यांची जाणीव संबंधित पाठांच्या सहाय्याने करून देणे आवश्यक वाटते.

१८. जीवनांतील दैनिक बचतीबाबतची होकारार्थी नोंदणी ९५% शहरी तर १००% ग्रामीण विद्यार्थिनींपेक्षा शहरी विद्यार्थिनीमध्ये बचतीची सवय निर्माण करून चैनीच्या वस्तुवर होणारा व्यर्थ खर्च थांबविणे तसा संस्कार पाठांच्या सहाय्याने करणे आवश्यक आहे.

१९. साधनसामुग्रीची मर्यादा लक्षात घेऊन जीवन पद्धतीत काटकसर करण्याबाबत होकारार्थी प्रतिसाद ९५% शहरी तर १०० % ग्रामीण विद्यार्थिनींनी नोंदविलेला आहे. नैसर्गिक साधन संपत्ती पाणी, वीज इ. उपयोग प्रमाणात करून काटकसरीच्या जीवन पद्धतीचा संस्कार शहरी विद्यार्थिनींवर पाठांच्या सहाय्याने करणे गरजेचे आहे.

२०. आपले घर नांव, सुखी ठेवण्याबद्दल होकारार्थी प्रतिसाद ९५% शहरी तर १०० % ग्रामीण विद्यार्थिनींनी नोंदविलेला आहे. शहरी विद्यार्थिनींना खऱ्या सुखी, समृद्ध व नैसर्गिक जीवन पद्धतीची जाणीव संबंधित पाठांच्या सहाय्याने देऊन त्यांना जीवनातील खरा आस्वाद घेण्यास सक्षम बनविणे गरजेचे आहे.

# ग्रामीण व शहरी म. शिक्षकांच्या अध्यापन कार्याची तुलना

संशोधकांनी ग्रामीण विभागातील व शहरी विभागातील शिक्षकांना प्रश्नावली दिली होती. आणि त्यांच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले अध्यापन कार्यामध्ये शिक्षक हा अत्यंत महत्वपूर्ण घटक आहे. त्यांचा विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संपर्क येत असल्याने अध्यापन प्रभावी होण्यासाठी अधिक प्रयत्न होणे आवश्यक असते. त्यांच्याकडून आलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण पुढील प्रकारे मांडण्यात आले.

१. विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषा प्रेम वाढविण्याचा प्रयत्न शहरी शिक्षक १००% तर ग्रामीण शिक्षक ९५% प्रमाणांत करतात. यावरून असे स्पष्ट होते की, ग्रामीण शिक्षकांनी भाषिक पाठांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांवर आपल्या मातृभाषेवर प्रेम करण्यासाठी अधिक प्रयत्न केले पाहिजेत.

२. विद्यार्थ्यांना वाढत्या लोकसंख्येच्या परिणामांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केल्याची नोंद १०० % शहरी तर ९५% ग्रामीण भागातील मराठीचे शिक्षक करत असतात यावरुन ग्रामीण विभागातील शिक्षकांनी संबंधित पाठांच्या सहाय्याने ही जाणीव जोपासण्याचा प्रयत्न करणे आवश्यक वाटते.

३. पाठ शिकवितांना लोकसंख्या विषयक आशय भरण्यासाठी संधी आढळल्यास ९२% शहरी शिक्षक तर ८४% ग्रामीण शिक्षक तसा प्रयत्न करतात असे आढळले. पाठ शिकवितांना ग्रामीण शिक्षकांनी लोकसंख्या विषयक आशय भरण्याचा प्रयत्न पद्धतशीर रीतीने केला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

७. [illegible]

४. पाठाच्या अनुषंगाने आवश्यक अशी लोकसंख्या विषयक ज्यादा माहिती देण्याचा प्रयत्न ५८% शहरी शिक्षक तर ७३% ग्रामीण शिक्षक करतात असे दिसून येते. शहरी विभागातील लोकसंख्येचे विविध [illegible] दुष्परिणामांची योग्य जाणीव ठेवून शहरी शिक्षकांनी आवश्यक अशी माहिती विद्यार्थ्यांना देणे अनुप्राप्त ठरते. ग्रामीण विभागातील लोकसंख्या विषयक प्रश्नांचे स्थानिकस्वरूप ध्यानात घेऊन अनुषंगिक माहिती विद्यार्थ्यांना अध्यापन करताना दिली पाहिजे.

५. पाठाशिवाय अन्य सांस्कृतिक उपक्रमांच्याद्वारे लोकसंख्या विषयाची माहिती पुरविण्याचे कार्य ८७% शहरी शिक्षक तर ७५% ग्रामीण शिक्षक करीत असतात. शहरी विभागामध्ये विविध प्रकारच्या पूरक उपक्रमांचे आयोजन करून उपयुक्त माहिती शिक्षकांनी दिली पाहिजे.

६. लोकसंख्या विषयाचे उपक्रमांचे आयोजन करताना विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात ७५% शहरी व ७३% ग्रामीण शिक्षक यशस्वी ठरलेली आहेत. सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करताना [illegible] विद्यार्थ्यांचे सहकार्य घेऊन ग्रामीण शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासा जोपासली पाहिजे.

७. लोकसंख्या विषयक उप-क्रमांचे आयोजन करणाऱ्या ४३% शहरी तर ४३% ग्रामीण शिक्षकांनी [illegible] आपला प्रतिसाद होकारार्थी नोंदविलेला आहे. अशाप्रकारे उपक्रमांचे आयोजन करण्याचे प्रयत्न शहरी व ग्रामीण दोन्हीही क्षेत्रांत अधिक प्रयत्न [illegible] होण्याची गरज आढळते. पाठ्यपुस्तकाच्या अध्यापना बरोबरच अभ्यासानुवर्ती उपक्रमांच्या सहाय्याने लोकसंख्या विषयक शिक्षणाचा आशय विद्यार्थ्यांना समजाविणे [illegible] [illegible] ठरते.

८. लोकसंख्या शिक्षणाच्या उपक्रमाच्या आयोजनाची नेमकी नोंद ७२% शहरी तर ६१% ग्रामीण शिक्षकांनी केलेली आहे. शहरी विभागातील शिक्षकांनी अधिक प्रमाणांत अशा कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे. अशा प्रकारच्या कार्यक्रमांची योजना उद्दिष्टानुसार केली जाणे आवश्यक वाटते. ग्रामीण विभागातील स्थानिक परिस्थिती नुसार पूरक उपक्रम असावेत.

९. लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार घडविण्याच्या कार्याबाबत मुख्याध्यापकांचे सहकार्याबद्दल ५०% शहरी शिक्षकांनी तर ५७% ग्रामीण शिक्षकांनी आपला होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे. शहरी विभागांत मुख्याध्यापकांनी आपला मराठी शिक्षकांना अशा प्रकारचा संस्कार घडविण्यासाठी योग्य प्रकारचे सहकार्य देणे क्रमप्राप्त ठरते.

१०. लोकसंख्या शिक्षणाचा आशय समजावून देण्यासाठी शाळेबाहेरील वातावरणांत पालक वर्गाच्या सहकार्याबद्दल ५८% शहरी तर ८६% ग्रामीण शिक्षकांनी होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे. शहरी शिक्षकांनी पालकवर्गाशी संपर्क साधून पालकाच्या विकासाच्या दृष्टीने अधिक प्रयत्नशील रहाणे आवश्यक वाटते.

## मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय कार्याची रूपरेषा व तुलना

शहरी तसेच ग्रामीण विभागात कार्य करणा-या मुख्याध्यापकांच्या समोर वेगवेगळ्या समस्या असतात. त्यांना शालेय परिसरात व शाळेबाहेरील परिसरात कोणकोणत्या समस्यांना समोरे जावे लागते हे जाणून घेण्याच्या प्रयत्न संशोधकांनी केला त्याचे विश्लेषण मांडण्यात आले.

१. मातृ भाषेच्या शिक्षकांना आवश्यक ते विशेष मार्गदर्शन करणा-या ८२% शहरी तर ६७% ग्रामीण मुख्याध्यापकांनी आपला प्रतिसाद होकारार्थी दर्शविला. ग्रामीण विभागांतील शिक्षकांनी अधिक मार्गदर्शनाची गरज असते हे ओळखून मुख्याध्यापकांनी दैनिक कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

२. मातृभाषेच्या शिक्षकाचे शाळेत मंडळ स्थापन करून लोकसंख्या शिक्षण विषयक समस्यांचे संस्कार घडविण्याच्या कार्यास चालना देणा-या ८९% शहरी तर ६९% ग्रामीण मुख्याध्यापकांनी आपला प्रतिसाद दर्शविलेला आहे. ग्रामीणविभागांत मुख्याध्यापकांनी शिक्षकांनी सांघिक स्वरूप कार्य करण्यास अधिक प्रेरणा देणे गरजेचे आहे.

३. शाळेमध्ये लोकसंख्या विषयक खास उपक्रमांची नोंद ७९% शहरी ६७% ग्रामीण मुख्याध्यापकांनी केलेली आहे. ग्रामीण विभागांतील शाळेमध्ये मुख्याध्यापकांनी विशेष प्रयत्नशील राहून मराठी शिक्षकांना पुरक उपक्रमांच्या आयोजनासाठी प्रेरणा दिली पाहीजे.

४. लोकसंख्या शिक्षणाचा उपक्रमांची आवश्यकता ७१% शहरी तर ७२% ग्रामीण मुख्याध्यापकांनी जाणवते असे मत नोंदविलेले आहे. शहरी विभागात व ग्रामीण विभागांत अभ्यासेत्तर उपक्रमांच्या आयोजनांची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने मुख्याध्यापकांनी आपले संघटनात्मक कार्य अधिक प्रभावी केले पाहिजे.

५. लोकसंख्या विषयक संस्कार घडविण्याच्या कार्यात मातृभाषेच्या शिक्षकाची उपयुक्तता ८२% शहरी तर ७२% ग्रामीण मुख्याध्यापकांनी होकारार्थी दर्शविलेली आहे. अन्य शिक्षकांच्या तुलनेने ग्रामीण विभागात मातृभाषेच्या शिक्षकांच्या मदतीने संस्काराचे कार्य मुख्याध्यापकांनी प्रगतीच्या दिशेने नेले पाहीजे.

६. अभ्यासेत्तर उपक्रमांच्या वेळी लोकसंख्या शिक्षणाचे संस्कार करण्याची अभिसुचन करण्याबाबत ८२% शहरी तर ६९% ग्रामीण मुख्याध्यापकांनी होकारार्थी प्रतिसाद नोंदविलेला आहे. ग्रामीण विभागातील शाळेच्या मुख्याध्यापकांनी विविध अभ्यासेतर उपक्रमांची योजना करताना लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार घडविण्याची सुचना मराठी शिक्षकासमोर मांडणे गरजेचे वाटते.

७. लोकसंख्या शिक्षणाची विविध माहिती देण्यासाठी त्यांना पाचारण करण्याबाबत ७१% शहरी तर ६७ %: ग्रामीण मुख्याध्यापकांनी आपली प्रतिक्रिया होकारार्थी दर्शविलेली आहे. ग्रामीण विभागात मुख्याध्यापकांनी शाळेमध्ये लोकसंख्या विषयाच्या तज्ञाचे मार्गदर्शन प्राप्त करून देणे अधिक गरजेचे आहे.

८. शिक्षक पालक संघाचे सहकार्य लोकसंख्या शिक्षणाच्या संस्कार बाबत ८२% शहरी ७८% मुख्याध्यापक मत असल्याचे आढळले. ग्रामीण विभागात शिक्षकांच्या समवेत पालकांनाही मुख्यापकांनी आपल्या कार्यात समाविष्ट करून घेणे अधिक गरजेचे वाटते.

९. मराठी शिक्षकांनी लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार करण्याची उपयुक्तता नोंदविलेला ८२% शहरी तर ७२% ग्रामीण मुख्याध्यापकांनी आपली होकारार्थी प्रतिक्रिया नोंदविलेली आहे. ग्रामीण विभागात मुख्याध्यापकांनी लोकसंख्या शिक्षणाचा उपयुक्त संस्कार घडविण्यासाठी अधिक प्रयत्नशील होणे गरजेचे वाटते.

१०. विद्यमान मराठी पुस्तकाच्या सहाय्याने इ. ९ वी मधील मुलांवर संस्कार घडविण्याबाबत ७३% शहरी तर ७२% ग्रामीण मुख्याध्यापकांनी आपली प्रतिक्रिया होकारार्थी नोंदविलेली आहे. शहरी विभागातील बदलत्या परिस्थितीनुसार लोकसंख्या विषयाचा उपयुक्त संस्कार घडविण्यासाठी पाठ्यपुस्तकात आवश्यक माहिती समाविष्ट करणे गरजेचे आहे, असे आढळले.

## लोकसंख्या शिक्षण विषयातील तज्ञ मार्गदर्शक व त्यांचे विचारांचे विश्लेषण

संशोधकांनी लोकसंख्या शिक्षण विषयक प्रशिक्षण केंद्रावर मार्गदर्शनाचे कार्य करणा-या तज्ञांची मुलाखत घेऊन त्यांचे बहुमोल विचार जाणून घेतले. त्यांच्याविचारांचे पृथःकरण करून मांडले.

१. ई. ९ वी च्या पाठ्यपुस्तकाचे सहाय्याने, मुलांवर लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार करण्यात बाबत ६४% तज्ञांनी अनुकूल प्रतिसाद दर्शविलेला आहे.

२. पाठामध्ये लोकसंख्या विषयक आशय आल्यास त्यांचा उपयोग करण्याबाबत अभिसूचित करण्याबाबत ६५% तज्ञांनी होकारार्थी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. तज्ञांच्या सूचनेचे मराठी शिक्षकांनी पालन करणे गरजेचे आहे. प्रशिक्षण त्यांना पुरविण्यात येणा-या मार्गदर्शनाचा लाभ त्यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांपर्यन्त पोहेचविला पाहिजे.

३. पाठ्यपुस्तकास पुरवणी म्हणुन अभ्यासक्रम देण्याबाबत ९४% तज्ञांनी अनुमती दर्शविलेली आहे. लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार घडविण्यासाठी पुरवणी पुस्तिका तयार करण्याची गरज आहे.

४. ई. ९ वी च्या अभ्यासक्रमांत प्रचलित पाठामध्ये लोकसंख्या शिक्षण विषयाचा आशय घालण्याबाबत ९१% तज्ञांनी अनुकूलता दर्शविलेली आहे. विद्यमान पाठ्यपुस्तकांमध्ये अनुकूल जागांत शोध घेऊन आवश्यक माहिती समाविष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे.

५. मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये लोकसंख्या शिक्षणाची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने बदल सुचविण्यास ७५% तज्ञांनी अनुकूल उपक्रमांची होकारार्थी प्रतिक्रिया दर्शविलेली आहे. लोकसंख्या विषयक उपक्रमामध्ये बदल करणे आवश्यक वाटते.

६. लोकसंख्या शिक्षण विषयक उपक्रमांच्या आयोजनाबाबत छात्र-प्रशिक्षणार्थींना केल्या जाणा-या मार्गदर्शनाबाबत ७२% तज्ञांनी होकारार्थी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. प्रशिक्षणार्थींनी अशा प्रकारच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना घडवून देणे आवश्यक वाटते.

७. ई. ९ वी च्या पाठ्यक्रमाच्या आधारे लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार घडविण्याबाबत येणा-या अडचणींचा होकारार्थी प्रतिसाद ८२% तज्ञांनी नोंदविलेला आहे. तसेच विद्यमान पाठ्यक्रमातील विविध उपक्रमाच्या जागांचा शोध घेणे गरजेचे वाटते.

८. पाठ्य क्रमांत येणा-या अडचणींवर उपाय सुचविण्याबाबत ७३% अनुकूल प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. मराठी शिक्षकांनी पाठांत येणा-या अडचणींवर उपाय काढून अध्यापन अधिक प्रभावी बनविले पाहिजे.

९. प्रशिक्षणाची शिक्षक लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार मराठी पाठ्यक्रमाद्वारे करण्याचे आव्हान पेलू शकतील, या बाबतचा होकारार्थी प्रतिसाद ९१% तज्ञांनी दर्शविलेला आहे. मराठी शिक्षकांनी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करणे गरजेचे आहे.

१०• लोकसंख्या शिक्षणाबाबत साहित्यीकांच्या कार्याबाबत प्रतिक्रिया ७३% तज्ञांनी होकारार्थी दर्शविली• साहित्यकांनी आपले सामाजिक जाणिव, जोपासण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्ग-दर्शन करणे गरजेचे आहे•

११• पाठ्य पुस्तक रचना कारांनी सुद्धा लोकसंख्या शिक्षणाचा संस्कार करण्याबाबत ७३% तज्ञांनी होकारार्थी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. विद्यमान पाठ्यपुस्तकाच्या रचनेत लोकसंख्या प्रशिक्षणाचा संस्कार घडविण्यासाठी अनुकूल असे परिवर्तन पाठ्यपुस्तक रचनाकारांनी घडविले पाहिजे•